**Lokmat 06.04.20**

# ६० परदेशी नागरिक मायदेशी रवाना

## लॉकडाऊनमुळे अडकले होते : पुणे पोलिसांच्या सहकार्याबद्दल मानले आभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशभरात लॉकडाऊन झाल्याने गोवा व महाराष्ट्राच्या विविध भागांत १४२ अमेरिकी व जर्मन नागरिक अडकून पडले होते. अमेरिकन दूतावासाच्या मदतीने त्यांच्यासाठी विमानाची व्यवस्था केल्याने पुणे पोलिसांच्या मदतीने ते शनिवारी रात्री मुंबईकडे रवाना झाले. यातले ६० परदेशी नागरिक पुण्यातले होते. प्रादुर्भाव रोखण्यासाठी परदेशी विमान सेवा बंद केली. भारतात विविध अमेरिकी कंपन्यांमध्ये काम करणारे अमेरिकी नागरिक तसेच मूळचे भारतीय पण सध्या अमेरिकी नागरिक असलेले लोक येथेच अडकून पडले. अमेरिकी दूतावासाने व्यवस्था केली.

अमेरिक दूतावासातील अधिकारी मॅथ्यू पोडलक हे काही अमेरिकी नागरिकांना घेऊन गोव्याहून निघाले. ६० अमेरिकन नागरिकांना वारजे माळवाडी येथे एकत्र येण्यास सांगितले होते.

शनिवारी सायंकाळी गोव्यातली बस पुण्यात येणे अपेक्षित होते. मात्र, त्यांना तीन तास उशीर झाला, अशी माहिती वारजे माळवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांनी दिली.

गोव्याहून येणाऱ्या गाड्या उशिरा येत असल्याचे अधिकारी मॅथ्यू यांनी कळविले. त्यांच्याबरोबर लहान मुलेही होती. जसा गाड्यांना उशीर होऊ लागला, तसे ते बैचेन होत होते. तोपर्यंत पोलिसांनी या सर्वांना सोशल डिस्टन्सिंग राखण्यास सांगून चहा-पाण्याची व्यवस्था केली. मॅथ्यू हे सातत्याने संपर्कात होते. शेवटी रात्री साडेदहा वाजता गोव्याहून तीन बसगाड्या आल्या.

तरीही एक नाईक कुटुंब अजून आले नव्हते. मॅथ्यू यांना विनंती करुन काही वेळ गाड्या थांबून ठेवल्या. शेवटी नाईक कुटुंबाला घेऊन हे सर्व मुंबईला रवाना झाले. अमेरिकी नागरिकांना एकत्र करून त्यांना मुंबईला रवाना करेपर्यंत त्यांची काळजी घेतल्याबद्दल मॅथ्यू पोडलक यांनी पुणे पोलिसांचे आभार मानले.

**Lokmat 23.04.20**

# ४५५ परदेशी नागरिक मायदेशी परतले

## पुणे परिसरातून रवाना : दुतावासांकडून खास विमानांची सोय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशात लॉकडाऊन केल्यानंतर संपूर्ण विमान वाहतूक बंद करण्यात आल्याने विविध देशातील शेकडो परदेशी नागरिक भारतात अडकून पडले आहेत.

बऱ्याच देशातील दुतावासांनी त्यांच्या नागरिकांना घेऊन जाण्यासाठी खास विमानांची सोय केल्याने पुणे व परिसरातील ४५५ परदेशी नागरिक मायदेशात रवाना झाले. या नागरिकांना परदेशात जाण्यासाठी या देशांचे दुतावास तसेच परकीय नागरिकांच्या संपर्कात असणारे स्थानिक संपर्क अधिकारी यांच्यात समन्वयान्वये त्यांना पुणे ते मुंबई अशी प्रवास सवलत परवाना पोलीस उपायुक्त बच्चनसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण, उपनिरीक्षक राजेंद्र पोळ यांनी उपलब्ध करुन दिला.

ब्रिटीश नागरिक ७, कॅनडा ४, युएसए १३१, जपान ६, स्वीडन ७, ब्राझील ३, आयरिश ४, ऑस्ट्रेलिया १, जर्मनी १५०, फ्रान्स १६ या नागरिकांचा समावेश होता. बेहरीनमधील १२५ जण पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन मायदेशी रवाना झाले होते.

**Loksatta 24.04.20**

# ४५५ परदेशींना पोलिसांची मदत

## पुणे-मुंबई प्रवासाची सवलत




लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** टाळेबंदीत शहरात अडकून पडलेल्या विविध देशातील ४५५ परदेशी नागरिकांना पुणे पोलिसांनी मदतीचा हात दिला असून पोलिसांनी विविध देशांच्या दुतावासातील अधिकाऱ्यांबरोबर संपर्क साधून त्यांना मायदेशी पाठविण्याची व्यवस्था केली.

करोनाच्या संसर्गामुळे पुणे शहरात अनेक परदेशी नागरिकांना मायदेशी परतणे अशक्य झाले होते. टाळेबंदीत विविध देशातील दूतावासांनी भारतातील विविध शहरात अडकलेल्या परदेशी नागरिकांच्या मदतीसाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्यांना मायदेशी रवाना होता व्हावे, यासाठी विशेष विमानाची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. शहरात अडकलेल्या ४५५ परदेशी नागरिकांना पुणे-मुंबई प्रवासाची सवलत देऊन त्यांना मायदेशी रवाना होण्यासाठी मदत करण्यात आली.

पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम,सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त बच्चन सिंह, पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण, राजेंद्र पोळ यांनी परदेशी नागरिकांना प्रवाशाची सवलत देण्यासाठी प्रयत्न केले.

इंग्लडमधील ७, कॅनडातील ४, अमेरिकेतील १३१, जपानमधील ६, स्वीडनमधील ६,ब्राझीलमधील ३, आयर्लंडमधील ४, ऑस्ट्रेलियामधील १,जर्मनीतील १५०, फ्रान्समधील १६, रोमानियातील १ आणि बहरीनमधील १२५ नागरिकांना विशेष प्रवास सवलत देण्यात आली.

**Mata 23.04.20**

# विदेशी नागरिकांना पुणे पोलिसांची मदत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

लॉकडाउनमुळे शहरात अडकून पडलेल्या विविध देशांतील ४५५ विदेशी नागरिकांना पुणे पोलिसांनी मदतीचा हात दिला आहे. पोलिसांनी विविध देशांच्या दूतावासातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना मायदेशी पाठविण्याची व्यवस्था केली आहे.

करोनाचा संसर्ग वाढू नये म्हणून देशात लॉकडाउन करण्यात आले आहे. त्यामुळे शहरात अडकलेल्या अनेक परदेशी नागरिकांना मायदेशी परतणे अशक्य झाले. विविध देशांतील दूतावासांनी भारतातील विविध शहरांत अडकलेल्या परदेशी नागरिकांच्या मदतीसाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. ज्यांना मायदेशी परत जायचे आहे, त्यांच्यासाठी संबंधित देशांनी विशेष विमानाची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. ही व्यवस्था मुंबईहून असल्यामुळे शहरात अडकलेल्या ४५५ परदेशी नागरिकांना पुणे-मुंबई प्रवासाची सवलत देऊन त्यांना मायदेशी रवाना होण्यासाठी मदत करण्यात आली. पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, सहपोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त बच्चन सिंह, पोलिस निरीक्षक शिल्पा चव्हाण, राजेंद्र पोळ यांनी प्रयत्न केले.



### ४५५ नागरिकांना मदत

पोलिसांनी मदत केलेल्यांमध्ये ब्रिटनचे ७, कॅनडाचे ४, अमेरिकेचे १३१, जपानचे ६, स्वीडनचे ६, ब्राझीलचे ३, आर्यलंडचे ४, ऑस्ट्रेलियातील १, जर्मनीतील १५०, फ्रान्समधील १६, रोमानियातील १ आणि ब्हारीनमधील १२५ नागरिकांचा समावेश आहे.

**Pudhari 26.05.20**

# हजारभर प्रवाशांची पुण्यातून हवाई घरवापसी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

गेल्या दोन महिन्यांपासून बंद असलेल्या पुणे विमानतळावरून सोमवारी पहिल्या दिवशी सुमारे ८ विमानांनी उड्डाण केले. यात ९८५ प्रवासी परराज्यात रवाना झाले. तसेच, पुण्यातदेखील ९ विमाने दाखल झाली असून, त्याअंतर्गत ६७२ प्रवासी पुण्यात दाखल झाले, अशी माहिती पुणे विमानतळ प्रशासनाने दिली.

लॉकडाऊनच्या ६० दिवसांनंतर सोमवारी सकाळी ६ वाजून ४२ मिनिटांनी इंडिगोचे पहिले विमान पुणे विमानतळावर दाखल झाले. पहिले विमान क्रमांक एसजी ८९३७ पुण्याहून दिल्लीला रवाना झाले. सोमवारपासून पुणे विमानतळावरून दिल्ली, चेन्नई, कोचीन, हैदराबाद, कोलकाता, बंगळुरू, जयपूर, अहमदाबाद या शहरांसाठी विमानसेवा सुरू झाली आहे. याबाबत विमानतळ संचालक कुलदीपसिंग म्हणाले की, कोरोना रोखण्यासाठी विमानतळावर विविध उपाययोजना केलेल्या आहेत. शहरात दाखल झालेल्या प्रवाशांना १४ दिवस विलगीकरणात राहण्याचा सल्ला दिला आहे.

**बोर्डिंग पास हाच डिजिटल पास**

विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना विमानतळावर खासगी वाहनाने जावे किंवा यावे लागते. मात्र, शहरात प्रवास करण्यासाठी पोलिसांचा डिजिटल पास आवश्यक असल्याने नागरिकांकडून डिजिटल पाससाठी अर्ज केले जात होते. ही बाब गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चन सिंग यांच्या निदर्शनास आली. त्यानुसार विमानतळापर्यंत ये-जा करण्यासाठी खासगी वाहनाचा वापर केल्यास त्यांना स्वतंत्र पास देण्याची गरज नाही, त्यांच्याकडे असणारा बोर्डिंग पास हाच डिजिटल पास म्हणून ग्राह्य धरला जाईल, असे बच्चन सिंग यांनी स्पष्ट केले.




लोहगाव विमानतळावर प्रवाशांना थर्मल गनने तापमान तपासणीनंतर विमानात प्रवेश दिला जात होता.

### विमानसेवेचे दर

*दिल्लीसाठी ६ ते ८ हजार, बंगळुरूसाठी ३ हजार ८०० ते ५ हजार २९६, तर कोचीनसाठी ८ हजार ते ९ हजार, जयपूरसाठी ६ हजार ९५३, अहमदाबादसाठी ४ हजार २००, हैदराबादसाठी ५ हजार ८०० ते ८ हजार २२०, चेन्नईसाठी ४ हजार ७०० ते ७ हजार ५२० असा भाड्याचा दर वेगवेगळ्या विमान कंपन्यांचा होता. प्रवाशांची संख्या वाढली तर हे दर पुन्हा बदलू शकतील, असे सांगण्यात आले.*

### क्वारंटाईन कालावधी पूर्ण

केंद्र सरकारच्या वंदे भारत मिशनअंतर्गत परदेशातून आलेल्या ९७ प्रवाशांचा चौदा दिवसांचा क्वारंटाईन कालावधी पूर्ण झाला असून, त्यांना रविवारी घरी सोडण्यात आले. आतापर्यंत परदेशातून पुण्यामध्ये आलेल्या ४०९ प्रवाशांना शहरातील विविध हॉटेलमध्ये क्वारंटाईन करण्यात आले आहे. पुढील कालावधीत आणखी प्रवासी येण्याची शक्यता आहे. सर्व प्रवाशांची विमानतळावर वैद्यकीय चाचणी करून त्यांना बालेवाडी- म्हाळुंगे येथील एका हॉटेलमध्ये क्वारंटाईन करण्यात आले होते. त्यांचा अहवाल निगेटिव्ह आल्यानंतर सर्वांना रविवारी घरी सोडण्यात असल्याची माहिती महापालिका अधिकारी राजेंद्र मुठे यांनी दिली.

**Prabhat 23.05.20**

# पुण्यातून ३३ हजारांवर नागरिक मूळगावी परतले

**पुणे, दि. २२** - लॉकडाऊनमुळे पुण्यात अडकून पडलेल्या परप्रांतीय नागरिकांना त्यांच्या गावी पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार दि. ९ मेपासून ३३ हजार ४२१ कामगार आणि नागरिकांना रेल्वेने त्यांच्या मूळगावी पाठवून देण्यात आले आहे.

करोना आणि लॉकडाऊननंतर पुणे शहरात राहणारे हजारो परप्रांतीय कामगार, विद्यार्थी, नागरिक अडकून पडले होते. एकीकडे हाताला काम नाही, पैसा नाही आणि दुसऱ्या बाजूला करोनाचे संकट आल्यामुळे ते अडचणीत सापडले होते. सर्वांनाच आपल्या गावची ओढ लागली आहे. दरम्यान, दोन आठवड्यांपूर्वी केंद्र तसेच राज्य सरकारच्या निर्देशांप्रमाणे परप्रांतीय कामगारांना रेल्वेने तसेच बसने त्यांच्या मूळ गावी पाठवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दि. ९ ते २१ मे कालावधीत पुणे शहरातून ३३ हजार ४२१ नागरिक आणि कामगारांना त्यांच्या मूळगावी पोहचले आलेत.

पोलीस आयुक्त के. वेंकटेशम, सहआयुक्त रवींद्र शिसवे, अशोक मोराळे, नोडल अधिकारी पोलीस उपायुक्त सारंग आव्हाड या नेतृत्वाखाली ही कामगिरी केली.

**Pudhari 11.05.20**

# रेल्वे प्रयागराजला रवाना

## पुण्यात अडकलेले १२०० मजूर निघाले आपल्या गावाला

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

रेल्वे प्रशासनाकडून लॉकडाऊनमुळे शहरात अडकलेल्या मजुरांना त्यांच्या गावी पोहचविण्यासाठी रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास एक गाडी सोडण्यात आली. त्यात सुमारे १२०० मजूर घेऊन श्रमिक स्पेशल रेल्वे उत्तर प्रदेशातील प्रयागराज शहराकडे रवाना झाली.

२४ कोच असलेली ही रेल्वे पुणे ते प्रयागराज हे सुमारे १ हजार ४१५ किलोमीटरचे अंतर धावणार आहे. प्रशासकीय आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रेल्वेला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. रविवारी रेल्वे स्थानकावरून रेल्वे सोडण्याचे नियोजनाचे काम रेल्वेचे विभागीय वाणिज्य प्रबंधक सुरेशचंद जैन यांनी पाहिले. पोलिस प्रशासनाच्या मदतीने मजुरांना साडेसहाच्या सुमारास पुणे रेल्वे स्थानक परिसरात आणण्यात आले. सोशल डिस्टन्सिंगची काळजी घेत, रेल्वे प्रशासनाने पोलिस बंदोबस्तात मजुरांना रेल्वेत बसविले. या वेळी त्यांना पाण्याची बॉटल आणि फूड पॅकेटचे वाटप करण्यात आले. त्यानंतर श्रमिक स्पेशल पुणे स्टेशनवरून रात्री साडेआठच्या ठोक्याला प्रयागराजकडे रवाना झाली.



१२०० मजूर घेऊन श्रमिक स्पेशल रेल्वे पुणे स्टेशनवरून रविवारी रवाना झाली.

**Pudhasri 14.05.20**

# ..अन् घुमला 'पोलिस, जिंदाबाद'चा नारा

[illegible]



सुहास चव्हाण, योगेश ठिकेकर यांच्या उपस्थितीत राजस्थान येथील कामगार, मजूर यांना मूळ गावी ट्रॅव्हल्सद्वारे पाठविण्यात आले.

**Pudhari 16.05.20**

## आता जातोय...पण पुन्हा येणार!







भारती विद्यापीठ येथून मूळ, राजस्थानला जाण्यासाठी बसने प्रवास करणाऱ्या परप्रांतीय मजूर व कामगारांची भारती विद्यापीठ पोलिसांच्या वतीने तपासणी करण्यात आली.

**Pudhari 12.05.20**

# पोलिसांच्या मदतीने ३७५ मजूर परतले घरी

**वारजे : पुढारी वृत्तसेवा**

वारजे माळवाडी परिसरात रोजंदारीवर काम करणाऱ्या ३७५ परप्रांतीय मजुरांना वारजे पोलिसांनी बस उपलब्ध करून त्यांच्या मूळगावी गोरखपूरला जाण्यासाठी रवाना केले.

आठवड्यापूर्वी वारजे परिसरात अडकलेल्या परप्रांतीय मजुरांसाठी वारजे पुलाखाली आपल्या राज्यात कसे जावे, यासंबंधीचे पत्रक लावण्यात आले होते. त्या माहितीवरून असंख्य मजुरांनी गावी जाण्यासाठी धावपळ करीत मोठी गर्दी केली होती. तेव्हा पोलिसांनी त्यांना सौम्य लाठीमार करून पांगविले होते. त्यानंतर वारजे पोलिसांनी मजुरांची यादी तयार करण्याचे काम सुरू केले. त्यानुसार सोशल डिस्टन्सिंगचे काटेकोर पालन करीत वैद्यकीय तपासणी व नोंदणी केलेल्या या ३७५ मजुरांना मनपाच्या १९ बसेसमधून सायंकाळच्या वेळी पुणे रेल्वे स्थानकाकडे सोडण्यात आले.

या वेळी 'गुडविल इंडिया'चे कालिदास मोरे यांनी अवघ्या दोन तासांत मजुरांसाठी ४०० अन्नपाकिटे देऊन जेवणाची व्यवस्था केली. तसेच, सह्याद्री कुस्ती संकुलाचे विजय बराटे, स्वयंसेवक निखील दुर्गे व सागर लाड यांनी ४०० पाण्याच्या बॉटलची तातडीने व्यवस्था केली. या वेळी पोलिस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, सहायक पोलिस आयुक्त मच्छिंद्र चव्हाण, वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कदम, गुन्हे निरीक्षक अमृत मराठे, तसेच पोलिस अधिकारी व कर्मचारी तसेच शांतता दक्षता समितीचे ॲड. राहुल पाटील यांनी परिश्रम घेतले. परप्रांतीय मजुरांनी गावी जाताना 'महाराष्ट्र जिंदाबाद... महाराष्ट्र पोलिस जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या व टाळ्या वाजवून अभिवादन केले.



वारजे येथून गावी निघालेले परप्रांतीय मजूर.

## हडपसर येथील २४२ नागरिकांची गावी जाण्याची व्यवस्था

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

हडपसर परिसरात राहणाऱ्या सुमारे २४२ नागरिकांची त्यांच्या राज्यात जाण्याची व्यवस्था करण्यात आली. ९ मे रोजी उत्तर प्रदेशातील गाजियाबाद येथे १८० मजुरांना शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सूचनांची पूर्तता करून त्यांच्या मूळगावी पुणे स्टेशन येथून रल्वेने पाठविण्यात आले.

हडपसरच्या बंटर स्कूल शेल्टर होममधी असलेल्या २७ मजूर व १४ लहान मुलांना हडपसर पोलिस ठाण्यामार्फत कर्नाटक राज्यातील देवदुर्ग येथे पाठविण्यात आले. या वेळी त्यांना मास्क, सॅनिटायझर, पाण्याची बाटली, जेवण देऊन त्यांच्या राज्यात पाठविण्यात आले. तर सोमवारी मध्य प्रदेशातील १९ मजुरांना त्यांच्या मूळगावी पाठविण्यात आले. अपर पोलिस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग सुनील फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ ५ चे पोलिस उपायुक्त सुहास बावचे आणि हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश साठे यांच्या देखरेखीखाली मजुरांना त्यांच्या गावी पाठविण्यात आले.

**Punyanagari 23.05.20**

# पुण्यातील 33 हजार कामगार परतले मूळगावी

**❑ सहकार्याबद्दल पुणे शहर पोलिसांचे मानले आभार**

**पुणे** : लॉकडाऊनमुळे मागील दीड महिन्यापासून पुणे शहरात अडकून पडलेल्या परप्रांतिय नागरिकांना त्यांच्या गावी पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार दि.९ ते २१ मे या कालावधीत ३३ हजार ४२१ कामगार आणि नागरिकांना रेल्वेने त्यांच्या मूळगावी पाठवून दिले आहे. पुणे शहर पोलिसांनी या कामात मोलाची कामगिरी बजावली.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे देशभरात लॉकडाऊन केले. त्यानंतर पुणे शहरात राहणारे हजारो परप्रांतिय कामगार, विद्यार्थी, नागरिक अडकून पडले होते. एकीकडे हाताला काम नाही, पैसा नाही आणि दुसऱ्या बाजूला कोरोनाचे संकट आल्यामुळे ते अडचणीत सापडले होते. सर्वांनाच आपल्या गावची ओढ लागली आहे. दि.९ ते २१ मे या १३ दिवसांमध्ये पुणे शहरातून तब्बल ३३ हजार ४२१ नागरिक आणि कामगारांना देशाच्या विविध राज्यातील त्यांच्या मूळगावी पाठविण्यात आले आहे. हे सर्व कामगार पोलीस परिमंडळ २,३ आणि ४ मधील पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे आहेत.

पोलीस ठाण्यातून पुणे रेल्वे स्टेशनपर्यंतचा पीएमपी बस प्रवासाची सोय केली. तसेच, जेवण आणि पिण्याच्या पाण्याची सोयही केली. पोलिसांनी केलेल्या सहकार्याबद्दल कामगारांनी पोलीस दलाबद्दल आभार व्यक्त केले. पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम, सहआयुक्त रवींद्र शिसवे, अशोक मोराळे, नोडल अधिकारी पोलीस उपायुक्त सारंग आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली ही कामगिरी केली.

**Pudhari 21.05.20**

**...आमुचा रामराम घ्यावा!**



बुधवारी सकाळी छत्तीसगडला रवाना होणाऱ्या रेल्वेगाडीने आपल्या घरी जाण्यासाठी पुणे रेल्वे स्टेशनवर जमलेले परप्रांतीय मजूर. या ठिकाणी 'सोशल डिस्टन्सिंग'चे नीट पालन होताना दिसले.

**Pudhari 12.05.20**

# चार हजार परप्रांतीयांची घरवापसी

## हरिद्वार, जबलपूर, जोधपूरला रेल्वे रवाना



**सोमवारी दिवसभरात हरिद्वार, जबलपूर, जोधपूर या भागात पुणे येथून सुमारे ४ हजार प्रवासी रवाना झाले.**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पुणे शहरात गेल्या दीड महिन्यापासून अडकलेले मजूर रेल्वेने आपल्या गावाकडे जात आहेत. सोमवारी शहरातून ३ रेल्वेने सुमारे ४ हजार मजूर हरिद्वार, जबलपूर, जोधपूर येथे रवाना झाले.

पुणे रेल्वे स्थानकावरून शनिवारपासून देशातील विविध राज्यांसाठी रेल्वेगाड्या सोडण्यात येत आहेत. शनिवारी रात्री लखनौ, रविवारी रात्री प्रयागराज तर सोमवारी दुपारी १ च्या सुमारास उत्तराखंडमधील हरिद्वार येथे १२६० प्रवासी, मध्य प्रदेशातील जबलपूर येथे सायंकाळी ५.३० वाजता १४५६ प्रवासी रवाना झाले. तर रात्री १० वाजता राजस्थानातील जोधपूर येथे सुमारे १२०० पेक्षा अधिक प्रवासी रवाना झाले. या सर्व प्रवाशांना रेल्वे विभागाच्या वतीने अन्नाची पाकिटे, पिण्याचे पाणी देण्यात आले. तसेच, पीएमपीएमएल प्रशासनाकडून शहरातील विविध भागांतून मजुरांना पुणे स्टेशनपर्यंत आणण्यासाठी २०० बसेसचे नियोजन करण्यात आले होते. पोलिस प्रशासनाच्या मदतीने मजुरांना रेल्वे स्थानकावर आणण्यात आले. या वेळी सोशल डिस्टन्सिंगची

**Pudhari 13.05.20**

# स्पर्धा परीक्षार्थी खासगी बसने गावी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पुण्यात एमपीएससीची तयारी करण्यासाठी आलेल्या १६० विद्यार्थ्यांना अभिनव चौकातून मंगळवारी रात्री सात खासगी गाड्यांनी त्यांच्या गावी पाठवण्यात आले.

राज्याच्या अनेक भागातून आलेले सुमारे ५ हजार ३०१ विद्यार्थी लॉकडाउनमुळे अडकले आहेत. यातील १६० विद्यार्थ्यांना ७ खासगी बसने त्यांच्या गावी रवाना करण्यात आले. चार बस नांदेडला, तर तीन बस लातूरकडे पाठण्यात आल्या. यावेळी गुन्हे शाखेचे डीसीपी बच्चन सिंग, पोलिस निरीक्षक राजेंद्र मोहाडे उपस्थित होते. पोलिसांनी विद्यार्थ्यांना जेवण, पाणी बाटलीची व्यवस्था करून दिली, तसेच त्यांची आरोग्य तपासणीदेखील करण्यात आली. एमपीएससी विद्यार्थी संघटनेचे महेश बडे हे सर्व विद्यार्थ्यांची माहिती जमा करून मुलांना आपल्या गावी पाठवण्यासाठी मदत करत आहेत.




**स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी ट्रॅव्हल्सद्वारे आपल्या गावी गेले.**

**Pudhari 22.05.20**

# वानवडी येथून चारशे श्रमिक बिहारला रवाना

हडपसर : पुढारी वृत्तसेवा

गावा स्वतःची काळजी घ्या, असा दिलासा वानवडी पोलिसांनी दिल्यानंतर, कामगारांनी पुणे आमचे खरे गाव, पुण्याने आम्हाला जगवले, आशा प्रतिक्रिया दिल्या.

वानवडी पोलिस ठाण्यात नोंदणी केलेल्या बिहार येथील ४०० श्रमिकांना गुरुवारी वानवडी पोलिस ठाणे येथून १४ बसमध्ये बसून रेल्वे स्टेशनला पाठवण्यात आले. त्यानंतर बिहारला जाणाऱ्या रेल्वेमधून यांची जाण्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी परप्रांतीयांना वानवडी येथील दाऊदी बोहरा समाज पुणे, फातिमी मोहल्ला यांच्या संयुक्त विद्यमाने फिजिकल डिस्टन्स व कोरोना विषाणूसंदर्भातील सर्व काळजी घेत अन्न पॅकेट, पाणी बॉटल देण्यात आले. यावेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील, अलिअजगर राजकोटवाला, पीआरओ मुर्तुजा अलिहुसेन झिल्ला उपस्थित होते. ४०० परप्रांतीयांना बसमध्ये बसविणे तसेच सोशल डिस्टन्स व कोरोनाबाबत मार्गदर्शन करण्याचे काम वानवडी पोलिस दत्तात्रय तेलंग व इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी केले. यावळी पोलिसमित्र सुरेश तेलंग, प्रणव शिवशरण, विजय गायकवाड, हिरीश गिनेल्लू, अप्पा चेनिगुंड यांनी सहकार्य केले. वानवडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील यांनी सांगितले, वानवडी पोलिसअंतर्गत ४०० श्रमिकांना आज पाठवण्यात आले. आतापर्यंत ३५०० परप्रांतीयांना त्यांच्या गावाला पाठवण्यात आले. यामध्ये मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटकातील नागरिकांचा समावेश आहे.



**वानवडी पोलिस ठाण्यांतर्गत ४०० श्रमिकांना बसमधून रेल्वे स्टेशनला सोडण्यात आले. प्रतीक्षेत असलेले काही बिहारी नागरिक.**

**Pudhari 15.05.20**

# पोलिसांच्या सुहृदयतेने मजुरांची पायपीट संपली शिबिरात

पुणे : पुढारी वृत्तसेवा

मूळचं झारखंडचं असलेलं एक दाम्पत्य त्यांच्या पाच मुलांना सोबत घेऊन, जीवनावश्यक वस्तूंचं गाठोडं बांधून रस्त्यानं निघालं होतं. येरवड्यातील शाहादावल बाबा दर्ग्याजवळ ते कुटुंब पोहोचलं. दरम्यान, याच वेळी शहराचे सहपोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे हे परप्रांतातील मजुरांना त्यांच्या घरी पोहोच करणाऱ्या गाड्यांची व्यवस्था पाहून यापोलीहून पोलिस आयुक्तालयाकडे निघाले होते. त्यांना हे कुटुंब नजरेस पडलं. त्यांनी तातडीने गाडी बाजूला घेऊन त्यांची विचारपूस केली. त्यावेळी ते खराडीहून बालेवाडीला चालत निघाल्याचे समजले. बालेवाडीत त्यांच्या गावाकडचे काही लोकं त्यांना भेटणार असून, तेथून ते झारखंडला रवाना होणार होते, असे या मजुरांनी सांगितलं.




कुठे जायचे हे ठाऊक होते; मात्र कसे जाणार याबाबत त्यांच्याकडे काहीच माहिती नव्हती. दिवसभरात असे चौथे कुटुंब शिसवे यांना दिसले होते. त्यानंतर शिसवे यांनी त्यांना सुरुवातीला मास्क, सॅनिटायझर आणि मुलांना खाण्यासाठी बिस्किट आणि पाणी बॉटल दिल्या.

त्यानंतर त्यांना समजावून सांगत, तुम्हाला रेल्वेने किंवा इतर कोणत्या मार्गाने गावी पोहचविण्यात येईल, याची खात्री देत त्यांची रवानगी चक्क पोलिस गाडीतून कॅम्पमध्ये केली. तसेच त्यांच्या गावाकडील इतर लोकांशी संपर्क करून त्यांना सुद्धा कॅम्पमध्ये आणले. त्यामुळे अज्ञानामुळे पायपीट करत निघालेल्या एका कुटुंबाला योग्य वेळी मदत मिळाली.

दरम्यान, मागील पाच दिवसापासून हजारो परप्रांतीय नागरिकांना त्यांच्या मूळ गावी पोहोचविण्यासाठी पोलिस दिवसरात्र काम करीत आहेत. मग त्यांच्या नावाच्या याद्या तयार करणे असो, की त्यांच्याशी संपर्क करून त्यांच्या तिकिटासहीत प्रवासाची व्यवस्था करणे असो, समाजातील अनेक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून पोलिस हे आव्हान लीलया पेलत आहेत.

# हडपसर पोलिसांनी ४५६ मजुरांना पाठविले मूळ गावी

■ पुणे : प्रतिनिधी

हडपसर आणि परिसरामध्ये परराज्यातील सुमारे ४५६ मजुरांना एस.टी. आणि रेल्वेने मूळ गावी पाठविण्यात आले. तसेच, कर्नाटकला पायी जाणाऱ्या २२ नागरिकांनाही पोलिसांनी थांबवून एसटीद्वारे गावी पाठवविले. त्यांना फूड आणि पाण्याची बॉटल प्रत्येक मजुराला देण्यात आली. हडपसर भागातील उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, कर्नाटक व छत्तीसगडमधील स्थलांतरित मजुरांना हडपसर पोलिस ठाण्याकडून मूळ गावी पाठविण्यात आले, असे हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश साठे यांनी सांगितले.



साठे म्हणाले की, हडपसर-गाडीतळ येथून पीएपी बसद्वारे मजुरांना पुणे स्टेशन येथे नेण्यात आले. त्यानंतर त्यांच्या गावी जाणाऱ्या रेल्वेने बसवून देण्यात आले. हडपसर परिसरामध्ये परराज्यांतील अनेक मजुरांना मोठ्या प्रमाणावर आहेत. बिहारमधील २५०, उत्तर प्रदेश ७१, राजस्थान २५, छत्तीसगड ८९ आणि कर्नाटकमधील २२ नागरिकांना मूळ जाताना त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमलले होते. दरम्यान, सकाळी सर्वांना हडपसर पोलीस ठाण्यासमोर थांबविले होते. टोकन देऊन पीएपी बसद्वारे रेल्वे स्टेशनपर्यंत सोडण्यात आले; तसेच मुंबई व पुणे जिल्ह्यातील काही नागरिक शुक्रवारी हडपसरमार्गे कर्नाटककडे जात होते. ही माहिती हडपसर पोलिसांना मिळताच त्यांनी त्यांना हडपसर गाडीतळ येथील शाळेत जेवणाची आणि मुक्कामाची सोय केली. त्यांची नोंदणी करून कर्नाटकसाठी विशेष एसटीद्वारे पाठविण्यात आले. मुजरांनी गावी जाण्याची घाई करू नये, प्रत्येकाला गावाकडे पाठविण्याची शासनाकडून व्यवस्था करण्यात येत आहे. त्यासाठी गावी जाण्यासाठीचा पास काढा आणि थोडे थांबे, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.

हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक मनोज पाटील, सोमनाथ सुतार, रामेश्वर नवले, राहुल माने, अनिल सरडे आणि माजी सैनिक सुधीर जगताप, नानासाहेब वाघमारे, शैलेश कांबळे यांच्या पथकाने विशेष कामगिरी केली.

Sakal 16.05.20

# पायी निघालेल्या कामगारांना पोलिसांची मदत

## ४०५ कुटुंबांना आधार ; २५ हजार परप्रांतीयांना पोचविले सुखरुप घरी

**पुणे, ता. १५:** सहा महिन्यांचे बाळ कडेवर घेऊन निघालेली एक आई, तिच्या बरोबर दमलेल्या अवस्थेतच पाठीवर सॅक, पिशवीसह जड पावलांनी चालणारी पाच-सहा वर्षांची दोन मुले, डोईवर गाठोडी घेतलेल्या दोन मुली आणि संसाराचे पोतभर ओझे डोक्यावर घेतलेला बाप. खराडी येथून पायी बालेवाडीला व तेथून झारखंडला निघाले होते.

येरवड्याजवळील अंधाऱ्या रस्त्यावरुन पायी जाणाऱ्या या कुटूंबाला पाहून वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याची गाडी थांबली. कामगार कुटुंब घाबरलेल्या अवस्थेत गाडीकडे पाहू लागले. गाडीतून पोलिस सहआयुक्त डॉ.रविंद्र शिसवे उतरले. "तुम्ही लेकराबाळांना घेऊन पायी जाऊ नका, जेवण घ्या, आराम करा, आम्ही तुमच्या जाण्याची व्यवस्था करतो'', अशी विनंती केली. या प्रसंगाने गहिवरलेल्या पती-पत्नीनेही त्यांना हात जोडले.



### पुण्यात उत्तम नियोजन

मुंबईसह राज्यातील अनेक मोठ्या शहरांमधून कामगारांचे अक्षरशः लोंढे पायी रस्त्याने, लोहमार्गावरुन जाताना दिसत आहेत. बस, रेल्वे स्थानकात गर्दी होऊन गोंधळ उडत आहे. मात्र पुण्यात असे चित्र नाही, याविषयी डॉ. शिसवे म्हणाले, ""आम्ही दोन महिन्यांपासून कामगारांच्या कुटुंबांची राहण्याची, जेवण्याची व्यवस्था केली. वृद्ध, मुलांचे औषधोपचार केले. त्यामुळे अनेकांनी पायी जाण्याचे टाळले. तसेच गावी जाण्यासाठी बस व्यवस्थाही करुन दिली.

या पद्धतीने गावाकडे निघालेल्या ४०५ कामगार कुटुंबांना पोलिस आयुक्तांपासून ते पोलिस उपायुक्तांपर्यंतच्या अधिकाऱ्यांनी आसरा अन् आधार देत त्यांची पाठवणी केली. संवेदनशील पोलिसांनी २५ हजार परप्रांतीय कामगारांना त्यांच्या घरी सुखरुप पोचविण्यासाठी मदतीचा हात दिला. राज्यातील व परराज्यातील कामगार, विद्यार्थी, पर्यटक, रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांची वैद्यकीय कागदपत्रांची पडताळणी करुन त्यांना पोलिस परवानगी देत आहेत. पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, सहआयुक्त डॉ.रविंद्र शिसवे यांच्यासह अतिरीक्त पोलिस आयुक्त, उपायुक्त यांची टिम रात्रंदिवस लोकांना त्यांच्या गावी पाठविण्यासाठी धडपडत आहेत.

Sakal 23.05.20





# विद्यार्थी परतले स्वगृही

## पोलिसांचे सहकार्य; ३० खासगी बसद्वारे रवाना




स्वारगेट : लॉकडाउनमुळे शहरात अडकलेल्या स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना शुक्रवारी रात्री पुणे पोलिसांच्या मदतीने त्यांच्या गावी पाठविण्यात आले. पोलिस उपायुक्त बच्चन सिंग, पोलिस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे व वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोहिते यांनी विद्यार्थ्यांना निरोप दिला.

**पुणे, ता. २२ :** शहरात संचार मनाई आदेश लागू झाल्यापासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी पुण्यात अडकून पडले होते. या विद्यार्थ्यांना घरी परतण्याचे वेध लागले होते. परंतु लॉकडाउनमुळे त्यांना घरी जाता येत नव्हते. पुणे पोलिसांनी शहरात अडकलेल्या सातशे विद्यार्थ्यांना सहा दिवसांमध्ये तीस खासगी बसद्वारे त्यांच्या घरी पाठविले.

पोलिस आयुक्त डॉ.के.वेंकटेशम यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरीक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे, गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चन सिंग, सहाय्यक पोलिस आयुक्त विजय चौधरी यांनी या विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पावले उचलण्यास सुरूवात केली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोहिते यांनी विद्यार्थ्यांशी समन्वय साधण्यास सुरूवात केली. त्यानुसार ११ मे पासून आत्तापर्यंत ७०० विद्यार्थ्यांशी संपर्क साधून ३० खासगी बसद्वारे त्यांना गावी पाठविण्यात आले. नांदेड, लातूर, सातारा, अहमदनगर, बीड, बुलढाणा, चंद्रपुर, अकोला, उस्मानाबाद, नागपुर या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनींना पाठविण्यात आले आहे. पोलिसांकडून विद्यार्थ्यांना माफक दरात बससेवा व प्रवासाचा परवाना उपलब्ध करून देण्यात आला.

**“ पोलिसांनी आमची दखल घेत आमची जाण्याची व्यवस्था केली. पोलिसांसमवेत सामाजिक संस्थांनी आम्हाला मदत केल्यामुळे आमचा घरी जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उरलेल्या विद्यार्थ्यांनाही अशीच मदत करावी.**
**- विकास नरवडे,** विद्यार्थी.

**“ मी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करते. लॉकडाउनमुळे आमच्यासारख्या हजारो विद्यार्थ्यांना घरी जाता येत नव्हते. पोलिसांनी आमची बसची व्यवस्था केली. जेवण, पाणी, वैद्यकीय तपासणी करुन सहकार्य केले. घरी जाण्यासाठी उत्सुक आहोत.**
**- एक विद्यार्थिनी.**